महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०९/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १८ कि. मी. अंतरावरील चाचेर बाजार चौक येथे दिनांक ०९/०९/२०२२ चे ०४.३० वा. ते ०५.३० वा. दरम्यान यातील निळा रंगाचा ट्रैक्टर मौजा दुधाळा ते चाचेर गावाकडे येत असतांना बाजार चौक चाचेर येथे थांबुन फिर्यादीने शाहनिशा केली असता सदर ट्रॅक्टर हे विना क्रमांकाचे ज्यामध्ये अवैध रेती वाहतुन करतांना मिळुन आला. आरोपी चालक मालक नामे— ज्ञानेश्वर श्रीराम दिवटे वय ४८ वर्षे रा. सालई मेंटा यास ट्रैक्टर मधील रेती परवाण्याबाबत रॉयल्टी विचारण केली असता आरोपीने रेती बाबत कोणतीही रॉयल्टी नसल्याचे सांगितल्यावरून यातील आरोपी अवैधरित्या विनापरवाना शासनसचा कर चुकवुन रेती वाहतुन करतांना मिळुन आला. त्याचे ताब्यातुन एक ट्रॅक्टर ट्राली सह किमत ५,००,०००/—रू. व १ ब्रास रेती किमंत ३,०००/—रू. असा एकुण ५,०३,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि अतुल बान्ते यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि लांजेवार मो.क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत डब्लु सी एल सावनेर येथे दिनांक ०८/०९/२०२२ चे २०.५५ वा. सुमारास आरोपी नामे— रवि रमेश कोरडवार, वय ३८ वर्ष, रा. डब्लु सी एल सावनेर हा त्याच्या एम.एच— ४०/बी.व्ही— ४०७३ क्रमांकाच्या मोपेड गाडीने डब्ल्यु.सी.एल. सावनेर खदान नं. १ वर्कशॉप समोर ठेवलेला लोखंडी गडर ज्याची लांबी ५ फुट वनज ४० किलो किंमत १,६००/—रू. चा मुद्देमाल चोरीचा प्रयत्न करतानां मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— लक्ष्मण रविंद्र निमजे वय ४६ वर्ष रा. डब्ल्यु.सी.एल. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्रेणी पोउपनि अनिल तिवारी मो.क्र. ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**